(२६५)

क्र.का.५/मुद्रांक-१२/सुधारणा-
अनु.२५/सुधारणा/२०१२-१३ /५१०/१२
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
नविन प्रशासकीय इमारत ,
तळ मजला, पुणे-१.
दिनांक :-२०/०४/२०१२

**विषय :-** **मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे अनुसूची-१ चे अनुच्छेद २५ मधील सुधारणा.**

## परिपत्रक-

सर्वांना याद्वारे कळविण्यात येते की, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे अनुसूची-१ चे अनुच्छेद २५ मध्ये पुढीलप्रमाणे काही महत्वाचे बदल होण्याची शक्यता आहे.

**(ग) अनुच्छेद २५ मध्ये, -**

(एक) खंड (ब) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

(ब) पुढील हद्दीत असलेल्या स्थावर मालमत्तेच्या बाबतीत असेल तर,

| | |
|---|---|
| (एक) कोणत्याही महानगरपालिकेच्या हद्दीत किंवा स्थालगत असलेल्या कोणत्याही कटक क्षेत्राच्या हद्दीत किंवा उप-खंड (दोन) मध्ये नमूद न केलेल्या कोणत्याही नागरी क्षेत्रात | मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या ५ टक्के. |
| (दोन) कोणत्याही नगरपालिका किंवा नगर पंचायत किंवा स्थालगत असलेल्या कोणत्याही कटक क्षेत्राच्या हद्दीत, किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत असलेल्या कोणत्याही ग्रामीण क्षेत्रात, किंवा मुंबई मुद्रांक (मालमत्तेच्या प्रत्यक्ष बाजार मूल्याचे निर्धारण) नियम, १९९५ अन्वये प्रकाशित झालेल्या वार्षिक विवरणपत्रातील दराप्रमाणे प्रभाव क्षेत्रात. | मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या ४ टक्के |
| (तीन) कोणत्याही ग्रामपंचायतीच्या हद्दीतील क्षेत्रात किंवा उप-खंड (दोन) मध्ये नमूद न करण्यात आलेल्या अशा कोणत्याही क्षेत्रात. | मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या ३ टक्के |

(दोन) खंड (ड) वगळण्यात येईल,

उक्त सुधारणा झाल्यास, परिणाम पुढीलप्रमाणे होतील :-

- अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५) साठी नविन दर असे असतील.

| | क्षेत्र | दर |
|---|---|---|
| (१) | कोणत्याही, महानगरपालिका व भोवतीचे कटक क्षेत्र | ५% |
| (२) | कोणत्याही नगरपालिका, एम.एम.आर.डी.ए. क्षेत्र, नगरपंचायत क्षेत्र व प्रभाव क्षेत्राची गांवे | ४% |
| (३) | ग्रामपंचायत व तत्सम क्षेत्रे. | ३% |

वरील शिवाय जिल्हा परिषद, नगरपरिषद व नागपूर सुधार न्यासाचा अतिरिक्त कर नेहमी प्रमाणेच लागू राहील.

- निवासी मिळकतीसाठी स्वतंत्र दर अथवा सवलत असणार नाही.
- प्रभाव क्षेत्रातील गांवे याचा अर्थ, वार्षिक मुल्यदर तक्त्यातील प्रभाव क्षेत्राची गांवे असा राहील.

हे बदल कोणत्याही क्षणी लागू होण्याची शक्यता आहे. यासाठी ही अगाऊ सुचना देण्यात येत आहे. अंमलबजावणीबाबत आदेश येताच ते आपणांस लगेचच कळविण्यात येतील. अंमलबजावणीची तारीख मिळताच, आपण त्याप्रमाणे वसूली करावयाची आहे. अंमलबजावणीत चालढकल केल्याने काही वसूली अगर परताव्याची प्रकरणे निघाल्यास, संबधितांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरले जाईल.

तरी सर्वांना अंमलबजावणीची तारीख मिळताच, टाकोटाक अंमलबजावणी सुरु करावी.

**सही/-** XXX

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत-

१) मा. प्रधान सचिव, मदतकार्ये व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.

२) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

३) सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना

२/- आपणांस कळविण्यात येते की, आपले अधिपत्याखालील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना वरील परिपत्रक वितरीत करुन, त्याची जाणीव टाकोटाक करुन देण्यात यावी.

४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय यांना माहितीसाठी.

निर्गमित

**सह नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक**
**अधिक्षक (मुख्यालय),म.रा.पुणे.**